# .. Diwali ..

## ॥ दिवाळी ॥

रसिकहो गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अपूर्ण
कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला होता त्यातील ही
दिवाळी नावाची कविता.
जे गोविंदाग्रजां बरोबर गेले ते आपणास हरविले.
जे आहे ते या दिवाळीच्या निमित्ताने सादर करीत आहे.
सूरिन् उसगांवकर

॥ दिवाळी ॥
कवि गोविदाग्रज उर्फ़ राम गणेश गडकरी

जी दुःखी कष्टी जीवां दुसरी माता ।
वाढत्या वयांतहि लोभ जिचा सरता ॥
त्या निद्रादेवीच्या मी मांडीवरतीं ।
शिर् ठेउनि पडलों घ्यावयास विश्रांति॥

भोगितां या परि शांती ।दिव्य ती।
निजतात जगाचीं नातीं ।जागतीं।
जाळत्या मनाच्या वाती ।लोपती ।

धडधडां भोंवतीं तोंच फटाके उडती ।
मी जागा होउनि पाहत बसलों पुढतीं ॥
तों कळे उगवला आज दिवस वर्षाचा ।
वर्षाव जगावर करीत जो हर्षाचा ॥१॥

ही जुनी दिवाळी नव्या दमाने आली ।
ही नवी टवटवी जुन्या जगाच्या गालीं ॥
या नव्याजुन्याच्या मंगल संगमकालीं ।
जगिं आनंदीआनंद झूल जणुं घाली ॥
चहुंकडे दिवे हे ; दिवेच वरतीं खालीं ।
स्वर्ग़ीय अग्नितेजानें जगतीं न्हाली ॥
काढिलें फोल विश्वाचें ।चाळुनी ।
या रसांत नव तेजाचें ।जाळुनी ।



From http://sanskritdocuments.org

ढीगच्या ढीग हीणाचे। गाळुनी ।
तत्वाचें बावनकशीच सोनें सारें ।
ठेविले करा रे लक्ष्मीपूजन या रे ॥२॥

ही त्रयोदशी धन पूजायला असलें ।
काढीलें जुन्यातुनि नवें मनीं जें ठसलें ॥
जरि घरोंघरीं नव धन हें हांसत बसलें ।
नच परवा जरि लेणें जुनेंच असलें नसलें ॥
तीं लेणीं गतकाळाचीं। सर्वही ।
टाकिते गिळुनियां साची । जणुं मही ।
उघडते नव्या खात्याची । ही वही ।
जी झरली खरली शोभा वर्षाजालीं ।
ती पुन्हां लागली ल्याला सृष्टी सगळी ॥३॥
पालवी पळाली कधींच मधुमासांची ।
धुंदीही नाहीं आतां वर्षावाची ।
तरि साधीभोळी माता देवी सरला ।
हें तत्व शिकविते चुकल्या मुकल्या बाळा ॥
जें जुनें फार उपयोगें । जहालें ।
त्यातुनी आपुल्या जोगें । जें भलें ।
रंगवा नव्या नवरंगें । चांगलें ।
प्रतिवर्ष नव्याला जन्म जुन्यांतुनि देई ।
होळींत जाळितां शिशिर , वसंतचि येई ॥४॥
अति निर्मल जलयुत श्यानपुलिन सरिता या ।
घनदाट तामांतुनि चिमणासा शशिराया ॥
जें काल पेरिलें तेव्हां वाटे गेलें ।
तें आज पिकाला आलें , शतपट झालें ।

*apZ*I राम गनेश गडकरी उर्फ गोविंदाग्रज

Encoded and proofread by Surin Usgaonkar usgaonkar at hotmail.com

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated November 2, 2005



From http://sanskritdocuments.org
sanskritdocuments.org